0 3 APR 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आमदार आसगावकरांकडून कुलगुरूंचे अभिनंदन

## शिवाजी विद्यापीठाला जास्तीत जास्त निधी देण्याचे आश्वासन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळाले आहे. देशातील आकृषी विद्यापीठात हे दुसरे विद्यापीठ असल्याने शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले. विद्यापीठाला जास्तीत जास्त निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम, स्टडी सेंटरसह विद्यापीठाच्या प्रगतीची माहिती घेतली. तसेच शासनाकडून विद्यापीठाच्या काय अपेक्षा आहेत, यासंदर्भातील काही मुद्दे जाणून घेतले. विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस" मानांकन मिळाल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे, अशा शब्दात गौरवही केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. सागर डेळेकर, डॉ. जी. बी. कोळेकर, प्राचार्य दिलीप कुरळपकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करताना शिक्षक आमदार जयंत आसगावकर. सोबत डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

# विद्यापीठास निधी मिळवून देऊ : आ. आसगावकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठास 'नॅक'चे ए-प्लस प्लस मानांकन जाहीर झाल्यानंतर गुरुवारी आ. जयंत आसगावकर यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची भेट घेऊन अभिनंदन केले. विद्यापीठास जास्तीत जास्त निधी मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

याप्रसंगी आ. आसगावकर यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांना शुभेच्छा देताना शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेल्याची भावना व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. प्रा. आर. के. कामत, प्रा. सागर डेळेकर, प्रा. जी. बी. कोळेकर, प्राचार्य दिलीप कुरळपकर, आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे दुर्मिळ साधने प्रकाशित करण्याचे काम सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे राज्यातील इतिहासातील दुर्मिळ साधने प्रकाशित करण्याचे काम सुरू आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे दुर्मिळ ग्रंथ केंद्रातर्फे पुनर्प्रकाशित केले जातात. शाहूचरित्रकार कै. कृ. गो. सूर्यवंशी यांनी 'भारतीय मल्लविद्या : उदय आणि विकास' हा एक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला होता. तो आता दुर्मिळ आहे. या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन शाहू संशोधन केंद्रातर्फे केले जाणार आहे. त्यासाठी कै. सूर्यवंशी यांच्या वारसदारांनी संपर्क साधण्याचे आवाहन शाहू संशोधन केंद्रातर्फे केले आहे. केंद्राकडे उपलब्ध असणाऱ्या या ग्रंथाची प्रारंभीची काही पाने गहाळ झाली आहेत, जर कोणाकडे या ग्रंथाची प्रत असेल, त्यांनीही संपर्क करण्याचे आवाहन संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.